# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

**"माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित किल्ला सायक्लोथॉन 2024 यशस्वीरित्या संपन्न**

**पंचतत्वावर आधारित असलेल्या मूल्यांच्या माहितीची जनजागृती शहरातील नागरिकांमध्ये करणेकामी महानगरपालिकामार्फत किल्ला सायक्लोथॉन 2024 स्पर्धेचे आयोजन**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या "माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या "माझी वसुंधरा" उपक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित किल्ला सायक्लोथॉन 2024 चा शुभारंभ दिनांक 11 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी ठीक 6.45 वाजता करण्यात आला. किल्ला सायक्लोथॉन 2024 चा शुभारंभ भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आला. प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) मारुती गायकवाड, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त रवी पवार, शहर अभियंता दिपक खांबित, महानगरपालिका विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित किल्ला सायक्लोथॉन 2024 स्पर्धेस 600 हून अधिक सायकल प्रेमींनी हजेरी लावली. या स्पर्धेत 10 किमी सायकल स्पर्धेस 60 वर्षांवरील वयोगट, 21 किमी स्पर्धेस 18 ते 40 व 41 ते 69 वर्ष वयोगट (पुरुष-स्त्री) असे गट करण्यात आले. स्पर्धेची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथून, धारावी जंजिरा किल्ला मार्गे, पुन्हा नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे समाप्त करण्यात आली. तसेच स्पर्धे दरम्यान मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. शर्यत समाप्तीनंतर विजयी स्पर्धकांना मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांच्या हस्ते मेडल व धनादेश स्वरूपात पारितोषिक देण्यात आले.

21 किमी स्पर्धेत 18 ते 40 वय पुरुष गटात प्रथम क्रमांक रू. 51 हजार सूर्या थाटू , द्वितीय क्रमांक रू. 41 हजार अश्विन मार्देलकर, तृतीय क्रमांक रू. 31 हजार ओम कारंडे यांनी पारितोषिक पटकावले. 21 किमी स्पर्धेत 18 ते 40 वय महिला गटात प्रथम क्रमांक रू. 51 हजार योगेश्वरी कदम, द्वितीय क्रमांक रू. 41 हजार अपूर्वा गोरे, तृतीय क्रमांक रू. 31 हजार साक्षी पाटील यांनी पारितोषिक पटकावले. 21 किमी स्पर्धेत 41 ते 60 वय पुरुष गटात प्रथम क्रमांक रू. 51 हजार रमेश कुमार, द्वितीय क्रमांक रू. 41 हजार राजेश पै, तृतीय क्रमांक रू. 31 हजार पवन जावळे यांनी पारितोषिक पटकावले. 21 किमी स्पर्धेत 41 ते 60 वय महिला गटात प्रथम क्रमांक रू. 51 हजार पूनम चतुर्वेदी, द्वितीय क्रमांक

रू. 41 हजार विद्या दार्वेलकर, तृतीय क्रमांक रू. 31 हजार रश्मी कुलकर्णी यांनी पारितोषिक पटकावले. 60 वर्षावरील पुरुष गटात 10किमी स्पर्धेत प्रथम क्रमांक 21 हजार अंकुश बर्गे (सातारा), द्वितीय क्रमांक 15 हजार इलन गोवन, तृतीय क्रमांक 10 हजार जयराम शेट्टी यांनी पारितोषिक पटकावले. 60 वर्षावरील महिला गटात 10किमी स्पर्धेत प्रथम क्रमांक 21 हजार मंगला पै यांनी पारितोषिक पटकावले आहे. तसेच कर्नाटक बागलकोट येथून खास किल्ला सायक्लोथॉन 2024 साठी आलेल्या अरुण लमानी यांना रुपये 10 हजार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

शहरातील नागरिकांनी पर्यावरण आणि निसर्ग याविषयी संवेदनशील बनणे, नैसर्गिक साधन संपत्तींचे संवर्धन करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित माझी वसुंधरा अभियान अंतर्गत किल्ला सायक्लोथॉन 2024 मध्ये शहरातील जबाबदार नागरिक म्हणून जास्तीत जास्त सहभाग नोंदवला व पंचतत्वावर आधारित असलेल्या मूल्यांच्या माहितीची जनजागृती करणेकामी महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करून किल्ला सायक्लोथॉन 2024 ही स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न केल्याने सर्व नागरिकांचे व स्पर्धकांचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी आभार व्यक्त केले.